## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

## डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला आणि भारत मौसम विभाग

ईमेल – mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com

**वाशीम जिल्हा कृषि हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक – ०२.०७.२०१९**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक: ०३/०७/२०१९ ते ०७/०७/२०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०३/०७/२०१९ | ०४/०७/२०१९ | ०५/०७/२०१९ | ०६/०७/२०१९ | ०७/०७/२०१९ |
| पाऊस (मिमी) | ६० | ८० | १० | १६ | ५ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२ | २५ | २५ | २९ | ३० |
| किमान तापमान (अं.से.) | २३ | २१ | २१ | २२ | २२ |
| ढग स्थिती | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतः ढगाळ | पूर्णतःढगाळ |
| सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ८० | ९० | ८८ | ७५ | ७० |
| दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ७५ | ७० | ६० | ५५ | ५५ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| वाऱ्याची दिशा | २७८ | २६४ | २५९ | २५७ | २५३ |

| पिकाचे नाव | अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| सर्व पिके | | पुढील ३ दिवस जिल्ह्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस तर काही ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच मागील दोन दिवसात ज्या ठिकाणी चांगला पेरणी योग्य पाऊस पडला आहे तेथे शेतकरी बंधूनी पेरणीस सुरुवात करावी. ज्या ठिकाणी पुरेसा पाऊस पडलेला नाही अशा ठिकाणी पेरणी योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. पिक व पिकाचे वाण शक्यतो कमी कालावधीचे निवडावे. |
| कपाशी | पेरणी | कपाशीचे एकेए-५, एकेए-७, एकेए-८ या सरळ सुधारित वाणांसाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व मध्यम व भारी जमिनीत लागवड करिता ६० × १५ से.मी अंतर ठेवावे व अमेरिकन सुधारित जातीमध्ये एकेएच-०८१, पीकेव्ही-रजत, एकेएच-९९१६ हे वाण वापरावेत व लागवड अंतर मध्यम व भारी जमिनी करिता अनुक्रमे ६० × १५ से.मी व ६० × ३० से. मी ठेवावे. यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे. देशी संकरीत जात पीकेव्ही-डीएच-१ वाणासाठी लागवड अंतर ६० × ४५ सेमी ठेवावे व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण ३.० ते ३.५ किलो वापरावे. बीटी कपाशीचे योग्य व लवकर येणारे वाण वापरावे. मुलस्थानी जल संधरणासाठी सरी किंवा रुंद-वरंबा सरी पद्धतीचा अवलंब करावा. |
| सोयबीन | पेरणी | खरेदी केलेले किंवा घरचे बियाणे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासावी. सोयाबीनच्या पेरणीसाठी जेएस ९३-०५, जेएस-९५-६०, जेएस-२०-२९, जेएस-२०-३४, एमएयुएस-७१, एमएयुएस-१५८, एमएयुएस-६१२, एमएयुएस-१६२, डीएस-२२८ हे वाण वापरावे. यासाठी बियाण्याचे प्रमाण ७५ किलो/हेक्टरी वापरावे. सोयाबीन पिकामध्ये नत्र स्थिर करण्यासाठी, स्फुरद उपलब्ध होण्यासाठी व मातीतील बुरशीजन्य रोगांपासून बचावासाठी रायझोबियम व पीएसबी जीवाणु संवर्धक २५ ग्रॅम व ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. |
| तूर | पेरणी | तूर पिका करीता पिकेव्ही तारा, बीएसएमआर - ७३६, ८५३, AKPHM -11303(संकरीत), AKT-8811 (सुधारित वाण) या वाणांची निवड करावी व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व लागवड अंतर ६० × ३० सेमी ठेवावे. पेरणीपुर्वी बियाण्यास रायझोबियम २५ ग्रॅम/किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेन्डॅझिम २+१ ग्रॅम/किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | मुग व उडीद पिकाची पेरणी ७ जुलै च्या अगोदर करावी, मुग/उडीद पिकाचा कापसामध्ये आंतरपीक म्हणून समावेश करावा. मुग पिका करीता एकेएम-९९१८, पीकेव्ही एकेएम-४, पिकेव्ही-ग्रीन गोल्ड, पिकेव्ही- ८८०२ आणि उडीद पिका करीता एकेयु -१५ , टीएयु -१, टीएयु -२, पिडीकेव्ही- ब्लॅक गोल्ड. पेरणीपुर्वी बियाण्यास रायझोबियम २५ ग्रॅम/किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेन्डॅझिम २+१ ग्रॅम/किलो या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |
| ज्वारी | पेरणी | पेरणीसाठी लवकर येणारे वाण सीएसएच-३०, मध्यम कालावधीचे वाण सीएसएच-३५, एसपीएच-१६३५, सुधारित जातीमध्ये पीडीकेव्ही कल्याणी, सीएसव्ही-२०, सीएसव्ही-२७, सीएसव्ही-३४ वापरावे. |
| हळद | पेरणी | हळद लागवडीच्या नियोजनानुसार जमीनीला वखराच्या दोन आडव्या-उभ्या पाळ्या देऊन ताबडतोब |

| | | |
|---|---|---|
| | | मशागत करावी. |
| फळझाडे | लागवड | मागील दोन दिवसात ज्या ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली आहे तेथे शेतकरी बंधूनी फळझाडे लावण्यास सुरवात करावी, |
| भाजी पाला | लागवड | खरीप भाजीपाला पिकाचे रोपे तयार करण्यासाठी गादी वाफ्यावर बियाणे पेरावे. निशिगंध या फूल पिकाची लागवड करावी . |
| पशु व पक्षी | | पावसाळ्यात शेळ्या-मेंढ्यांना कोवळा हिरवा चारा खाल्ल्याने पोटात जंतूंची वाढ होते व विष तयार होऊन विषबाधा होते ते टाळण्यासाठी आंत्रविषार रोगाच्या लसीच्या १५ दिवसांच्या अंतराने दोन मात्रा टोचून घ्याव्यात. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करण्यात आली असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.